गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ७६ वा ● शुक्रवार ०२ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 76 | Date : 02/08/2024 | blow Friday | Page 4 Price 4

# देशातील ३० आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पांच्या अंमलबजावणीची तयारी

## महाराष्ट्रातील २० नदीजोड प्रकल्पाचा अहवाल तयार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : देशातील ३० आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पांच्या अंमलबजावणीची तयारी सुरू झाली आहे. लोकसभेत एका लिखित प्रश्नाच्या उत्तरावर जलशक्तीमंत्री सी.आर. पाटील यांनी ही माहिती दिली. यामध्ये महाराष्ट्रातील २ आंतरराज्यीय तर २० राज्यांतर्गत नदीजोड प्रकल्पांचा समावेश आहे. मात्र, यापैकी काही प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. देशातील ३० नदीजोड प्रकल्पांपैकी २४ प्रकल्पांची



व्यवहारता रिपोर्ट (एफआर) आणि ११ तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील २ आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्प आणि १ राज्यांतर्गत नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार आहे. लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे आणि भास्कर भगरे यांनी महाराष्ट्रासह देशातील नदीजोड प्रकल्पाविषयी लिखित प्रश्न विचारला. यावर जलशक्तीमंत्री सी.आर. पाटील यांनी उत्तर दिले. त्यांनी सांगितले की, दमनगंगा-पिंजळ नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार आहे. या प्रकल्पामुळे मुंबईला पाणीपुरवठा सुरळीत होईल. पारतापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पाचाही डीपीआर तयार आहे. हे दोन्ही प्रकल्प महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांतील आंतरराज्यीय । पान २ वर



# नेमबाज स्वप्नील कुसाळेचे अभिनंदन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : पॅरीस ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत कांस्यपदकाचा वेध घेणारा स्वप्नील कुसाळे महाराष्ट्राचा अभिमान आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नीलचे अभिनंदन केले आहे. कोल्हापुरच्या नेमबाज स्वप्नील कुसाळे याने नेमबाजीत ५० मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये कांस्य पदक पटकावले आहे.मुख्यमंत्री शुभेच्छा संदेशात म्हणतात, स्वप्नीलमुळे कुस्तीमध्ये भारतासाठी वैयक्तिक असे पहिले पदक पटकावणाऱ्या खाशाबा जाधव यांचे स्मरण झाले. तब्बल ७२ वर्षांनी स्वप्नीलने महाराष्ट्रासाठी या पदकाचा वेध घेऊन, तशाच पद्धतीचा आनंद आणि उत्साह राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी निर्माण केला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात नेमबाजीची एक मोठी परंपरा आहे.

ही परंपरा स्वप्नीलने कायम राखली आहे. कांबळवाडी सारख्या ग्रामीण भागातून येऊन स्वप्नीलने आपले राज्य आणि देशाचे नाव आंतरराष्ट्रीयस्तरावर झळकवले आहे. देशासाठी वैयक्तिक पदकाची कमाई करताना, स्वप्नीलने महाराष्ट्राचा क्रीडा क्षेत्रातील गौरव वाढवला आहे. स्वप्नीलच्या या यशात त्यांचे कुटुंबिय, प्रशिक्षक, मार्गदर्शक यांचे मोलाचे योगदान आहे, या सर्वांचे महाराष्ट्रातील तमाम जनतेच्यावतीने अभिनंदन, असे नमूद करून मुख्यमंत्र्यानी यापुढेही स्वप्नीलच्या वाटचालीसाठी आवश्यक असे सर्व ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली आहे.

तसेच त्याला स्पर्धेतील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापकपदाचा कार्यभार मनोज श्रोत्री यांच्याकडे



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापक पदाचा कार्यभार पंढरपूर तहसिल कार्यालयातील निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांच्याकडे देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने नायब तहसिलदार संवर्गातील अधिकार्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मनोज श्रोत्री यांच्याकडे श्री मंदिरातील व्यवस्थापकाचा कार्यभार देण्यात आला आहे.

मनोज श्रोत्री हे १९९५ ला महसूल शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. त्यांनी महसूल विभागात विविध पदावर कामकाज केलेले आहे. २०१६ पासून पंढरपूर व मंगळवेढा प्रांत कार्यालय येथे नायब तहसीलदार म्हणून कामकाज पाहिले आहे. तसेच निवासी नायब तहसीलदार म्हणून । पान २ वर

# येत्या विधानसभेत मी आमदार होणार : अभिजीत पाटील

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले १०००० झाडे लावण्याचा संकल्प. रक्तदान शिबिर. कुस्ती मैदान महा आरोग्य शिबिर डोळे तपासणी शिबिर असे भरगच्च कार्यक्रम करण्यात येणार आहेत

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत



आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने श्री विठुरायाला शेतकरी कष्टकरी ऊस उत्पादक कामगार आणि हा सुखी समाधानी व समृद्धी व्हावा व पंढरपूर मंगळवेढा तसेच माढा या ठिकाणी सर्वत्र पाऊस व्हावा व शेतकरी कष्टकरी समाधानी व्हावी असे साखरे त्यांनी आपल्या वाढदिवसानिमित्ताने विठुरायाला घातले आहे

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन नामदेव पायरी येथे महाआरती केल्यानंतर चेअरमन अभिजीत पाटील यांनी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी येत्या विधानसभेत मी आमदार होणारचअसे सांगून पंढरपुरा मंगळवेढा मतदारसंघात तसेच माढा मतदारसंघात या दोन्ही मतदारसंघातील लोक सर्वसामान्य कष्टकरी शेतकरी तरुण वर्ग व मला भावी आमदार म्हणून माझा उल्लेख करतात व सहसामान्य जनता मला आमदाराच्या । पान २ वर

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ द्यावा

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः शासनाकडून प्रत्येक समाजातील घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. सध्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत अर्ज भरण्याची प्रक्रिया प्रभावीपणे सुरु आहे. या योजनेत पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात जवळपास ९८ हजार ८५६ अर्ज भरुन घेण्यात आले आहेत. अजून उर्वरित पात्र महिलांचे अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करुन जास्तीत-जास्त पात्र महिलांना या योजनेचा लाभ द्यावा असे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.

महसुल पंधरवडा व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ तहसिल कार्यालय मंगळवेढा येथे आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, मदन जाधव, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, योगेश कदम, मुख्याधिकारी



चरणराज कोल्हे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे, वर्षा पाटील, जगन्नाथ गारोळे तसेच पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील संबधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार आवताडे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही शासनाची महत्वाकांक्षी योजना असून, योजनेचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्याला मिळाला पाहिजे यासाठी जास्तीत-जास्त महिलांना या योजनेत सहभागी करुन घ्यावे. तसेच पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येक पात्र महिलांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार आवताडे यांनी केले. त्याचबरोबर महसूल विभागाचा 'महसूल पंधरवडा' १ ते १५ ऑगस्टदरम्यान साजरा होत आहे. महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली असून, या योजनेतून एकही पात्र महिला वंचित राहू नये तसेच या यो याबाबत दक्षता घ्यावी. मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यात या योजनेबाबत संबधित यंत्रणा चांगले काम करीत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

तहसिलदार सचिन लंगुटे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत पंढरपूर तालुक्यात ६३ हजार ८६० ऑनलाईन अर्ज दाखल झाले असून, आतापर्यंत १० हजार अर्ज मंजूर करण्यात करण्यात आले असून, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने तालुक्यातील जास्तीत-जास्त महिलांना रक्षाबंधन दिवशी लाभ देण्यात येईल. तालुक्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी ५९२ अंगणवाडी सेविकांडून सर्वेक्षण करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मंगळवेढा तालुक्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण । पान २ वर



**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त ग्रामपंचायत गोगांव येथील कार्यालयात साजरी करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, महादेव पाटील, बसपा आलूरे, विशाल बनसोडे, विजयकुमार गायकवाड , अवलप्पा बनसोडे यासह अनेक मान्यवर उपस्थित होते**

# रेशन कार्डची प्रक्रिया ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन वितरीत करावी : अविनाश मडिखांबे

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात रेशन कार्डची प्रक्रिया ज्यामध्ये नवीन रेशनकार्ड दुबार रेशनकार्ड,विभक्त रेशनकार्ड,यात नाव समाविष्ट करणे,वगळणे,आदी ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे त्यामुळे जनतेची शैक्षणिक,शासकीय विविध योजनेतील जे कामे रेशन कार्ड मुळे होतात ती प्रलंबित आहेत आणि ऑनलाईन मुळे या प्रक्रिया होत नाहीत

सर्व्हर नसल्याने कोणतीच प्रक्रिया होत नाही तालुक्यातील जनता यामुळे धान्यापासून वंचित होत आहे त्यामुळे जनतेची अडचण तत्काळ लक्षात घेऊन ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरीत करावे रेशन कार्ड मध्ये नाव समाविष्ट करणे युनिट वगळणे नवीन रेशनकार्ड देणे आदी कामे त्वरित ऑफलाईन पद्धतीने चालू करावे असे आशयाचे निवेदन रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तालुका अध्यक्ष अविनाश अविनाश मडिखांबे यांनी तहसिलदार विनायक नगर यांच्याकडे केली आहे यावेळी तहसिलदार यांनी तत्काळ धान्य वितरीत करण्याचे आदेश दिले यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी तालुका कोषाध्यक्ष अंबादास गायकवाड,पश्र्िचम




महाराष्ट्र युवक नेते प्रा राहुल रुही शहर अध्यक्ष अजय मुकणार,तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे मेहंदीमिया जिडगे आदी पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते

# इंदापूर येथे दहावीत शिकणाऱ्या मुलाचा हृदयविकाराच्या धक्कयाने शाळेतच मृत्यू

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



इंदापुर/अतुल सोनकांबळेःश्री. नारायणदास रामदास हायस्कूल मधील इयत्ता दहावी शिकणारा विद्यार्थी प्रथमेश विकास खबाले (वय १६ वर्षे, रा.भाटनिमगाव,ता.इंदापूर) या शाळेतचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण इंदापूर तालुक्यातून हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, प्रथमेश विकास खबाले हा श्री नारायणदास रामदास हायस्कूल येथे इयत्ता दहावी शिकणारा विद्यार्थी दुपारी शाळेत आल्यानंतर दैनंदिन वेळे प्रमाणे शाळेच्या प्रांगणात सामूहिक प्रार्थना झाल्यानंतर हा विद्यार्थी वर्गात गेला. त्यानंतर बाकावर बसल्यानंतर त्याला चक्कर आली. शिक्षकांनी त्यास इंदापूर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. त्यानंतर इंदापूर उपजिल्हा रुग्णालय येथे शवविच्छेदन करण्यात आले.. या दुःखद घटनेने इंदापूर तालुक्यातील सर्व राजकीय पक्षाचे नेतेमंडळी यांनी शोक व्यक्त केला आहे

## संपादकीय

### टाळण्यास प्रवृत्त करावे,

बिबट्या विहिरीत पडण्याच्या घटना नेहमीच घडतात. त्याची सुटका करावी लागते. प्राणीच तो, त्याला काय कळते, अशीच बघ्यांची प्रतिक्रिया असते. पण अशी भावना व्यक्त करणारी माणसे जेव्हा पावसाळी पर्यटनस्थळी ,नाठायी जीव धोक्यात घालतात त्याचे काय? एखाद्या ठिकाणी माणसांनी प्रचंड गर्दी केल्याची छायाचित्रे अधूनमधून प्रसिध्द होतात. त्या ठिकाणी चेंगराचेंगरी होऊन माणसांचा जीव जाईल की काय अशी भीती वाटावी अशीच ती परिस्थिती असते. अतिउत्साह जीवावर बेतल्याच्या घटना दरवर्षी घडतात. त्यांच्या संख्येत वाढच होताना आढळते. निसर्गातील अनेक वाटा अनवट असतात. सगळीच ठिकाणे माणसांसाठी सोयीची नसतात. त्यात अनेक धबधबे, धरणांचे पाणीसाठवण, डोंगरदऱ्या यांचा समावेश असतो. माणसे तिथेही पोहोचण्याचा प्रयत्न करतात आणि जीव धोक्यात घालतात. म्हणजे करणी माणसांची आणि ठिकाणेच बदनाम होताना आढळतात. अशा अनेक ठिकाणांवर सरकारने यावर्षीदेखील बंदी घातली, बंदोबस्तही ठेवला. पण माणसे त्या बंदीची ऐशीतैशी करतात. मुंबईतील एका धबधब्यावर बंदोबस्त होता. तथापि सुमारे पन्नास पर्यटकांच्या एका गटाने पोलिसांचा डोळा चुकवून धबधबा गाठला खरा, पण पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने ते अडकले. आपत्कालीन यंत्रणा, पोलीस आणि अग्निशमन दल यांच्या जवानांनी त्यांची सुटका केल्याचे वृत्त माध्यमात प्रसिध्द झाले. आता सरकारने अजून काय करावे अशी लोकांची अपेक्षा असावी? बंदी घातली, बंदोबस्त ठेवला तरीही लोकांचा वेडेपणा सुरूच आढळतो. अशा अतिउत्साही लोकांसाठी बचावपथकांनी नेहमीच त्यांचा जीव धोक्यात का घालावा? घटना कुठेही घडली तरी पथके धाव घेतात. रात्रंदिवस काम करतात. अत्यंतधोकादायक ठिकाणीही माणसे जातात असे त्यांचे निरीक्षण असते. प्रशिक्षण घेतलेले असले तरी पथकातही माणसेच असतात. तीदेखील त्यांच्या कुटुंबातील कर्ते असतात. त्यांचे कुटुंब त्यांच्यावर अवलंबून असते. दुर्दैवाने अपघात त्यांच्याही बाबतीत घडण्याचा धोका नाकारला जाऊ शकेल का? असे प्रश्न लोकांना पडतच नसावेत का? बंदी घातल्याचा अर्थ त्यांना खरेच समजत नसेल का? माणसांची बुध्दी माणसाला इतर प्राण्यांपेक्षा वेगळे करते. त्या बुध्दीचा वापर माणसांनी करण्याची जाणत्यांना अपेक्षा आहे. काही होत नाही. या भावनेचा त्याग करावा, बुध्दीचा वापर करावा, बंदी आणि बंदोबस्तामागचा उद्देश समजवून घ्यावा, अनाठायी धाडस टाळावेच, इतरांनाही टाळण्यास प्रवृत्त करावे,

# साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती मेहकर येथे मोठ्या उत्साहात तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतीने साजरी !

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



बुलढाणा/राहुल साबळे :.०१/०८/२०२४ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांची जयंती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग व तथागत ग्रुपच्यावतिने मेहकर येथे मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या फोटोला पुष्पहार अर्पन करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांच्या चरणी पुष्प अर्पण करून आदरांजली वाहून सर्वांना साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संदिपभाऊ गवई यांनी आपले विचार व्यक्त करताना संगितले की,अण्णाभाऊ साठे हे समाजसुधारक आणि क्रांतिकारक विचारसरणीचे लेखक होते त्यांचा जन्म सांगलीत ०१ ऑगस्ट १९२० साली झाला. सर्वसामान्यांना सहज समजेल अशा ग्रामीण भाषेतून शाहीरी करत त्यांनी आयुष्यभर वंचितांसाठी समाजप्रबोधन केले. जातीव्यवस्था आणि गरीबीमुळे ते शिक्षण घेऊ शकले नाही. मात्र अवघी दीड दिवसाची शाळा शिकलेल्या अण्णाभाऊंनी साहित्य क्षेत्रात मात्र खूप मोठी झेप घेतली. लेखणी आणि प्रतिभेच्या बळावर त्यांनी अनेक पुस्तके लिहीली. सिद्धहस्त कादंबरीकार, लोकशाहीर म्हणून त्यांना समाजात आजही मानाचे स्थान आहे. त्यांच्या 'फकिरा' कादंबरीला राज्य सरकारचा उत्कृष्ठ कांदबरीचा पुरस्कार मिळालेला आहे. यासोबतच त्यांच्या अनेक कांदबऱ्या प्रसिद्ध आहेत. एवढंच नाही तर त्यांचे साहित्य चौदा भारतीय भाषा आणि इंग्रजी, जर्मन, रशियन अशा अनेक परदेशी भाषेतही प्रसिद्ध आहे. अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी; लोकनाट्यांमधून जनजागृतीचे कार्य केले होते. त्यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अत्यंत मोलाचे योगदान लाभले होते.अण्णाभाऊ साठे यांच्या कविता आणि शायरी, पोवाडे आजही अभिमानाने गायले जातात. त्यांचे 'माझी मैना' हे मुंबईबद्दल लिहिलेलं गीत आजही अजरामर आहे. अण्णाभाऊ साठे यांची शिकवण आजही तेवढीच समायोजित असून आजच्या समाज जीवनाला व भविष्यातील आपल्या वाटचालीला कायमस्वरूपी दिशादर्शक असल्याचे मत तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांनी व्यक्त केले..

# भादाणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी वंदना शेलार यांची बिनविरोध निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या व पाच गावांमध्ये विस्तार असलेल्या भादाणे गृप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी वंदना शेलार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते उपसरपंच नितीन शेलार यांनी आंपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार सरपंच जोत्स्ना भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा गुरुवारी भादाणे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात घेण्यात आली यावेळी वंदना काशीनाथ शेलार यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंचपदी निवड झाल्याचे घोषित करण्यात आले

यावेळी नितीन शेलार, दर्शना ठाकरे, विमल वाघे, दुर्गेश गुप्ते, मेघा भोईर हे ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते तर निवडणूकी दरम्यान सचीव म्हणुन ग्रामविकास



अधिकारी एम. बी. जाधव यांनी काम पाहिले तर यावेळी पडघा विज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता राम कोल्हे तळवली गृप सेवा सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार, माजी उपसरपंच प्रदीप भोईर, उद्योजक प्रफुल्ल शेलार, समाजसेवक अक्षय (भाऊजी) भोईर, दिनेश ठाकरे, विनीत शेलार, सागर पारधी यांनी उपसरपंच शेलार यांचे अभिनंदन केले.

# मुंबई–नाशिक महामार्गाच्या सुधारणेबाबत आज मंत्रालयात बैठक संपन्न

## मुंबई नाशिक टोल वसुली थांबवणे आणि वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तात्काळ उपाय योजना करण्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याला निर्देश : उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहापूर / विजय घनघावः मुंबई–नाशिक महामार्ग हा उत्तर महाराष्ट्राला राज्याच्या राजधानीशी जोडणारा महत्त्वाचा व प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी असते. सध्या या महामार्गावर आसनगाव, वाशिंद यासह इतर काही ठिकाणी उड्डाणपुलांची कामं सुरु आहेत. त्यातच पावसामुळे महामार्गावर खड्डे पडले आहेत. त्याचा वाहनधारकांना प्रचंड त्रास होत असून नाशिक ते मुंबई दरम्यानच्या प्रवासाचा वेळही ८ ते १० तासांवर पोहोचला आहे. तीन तासांच्या अंतरासाठी प्रवाशांना दुप्पटीपेक्षा जास्त वेळ लागत आहे. तसंच त्यांना आर्थिक, मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, ही बाब अतिशय गंभीर असून या महामार्गाची दुरुस्ती युद्धपातळीवर करणं आवश्यक आहे. महामार्गावरील खड्डे वेळीच बुजवल्यास वाहनांचा वेग वाढून वेळेची बचत होऊ शकते. मात्र, या महामार्गाच्या कंत्राटदाराकडून त्यात कुचराई झाल्याचं पहायला





मिळत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी संयुक्त पाहणी करून खड्ड्यांसह नादुरुस्त रस्त्यांचे ड्रोनद्वारे व्हिडिओ तयार करावेत. त्यानंतर जोपर्यंत खड्डे बुजवले जात नाहीत, महामार्गाची डागडुजी केली जात नाही, तोपर्यंत या महामार्गावरील टोल वसुली थांबवण्यासाठीचा प्रस्ताव देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बैठकीत दिले.मागील काही वर्षांपासून मुंबई–नाशिक महामार्गावर दर्जोन्नती, रुंदीकरण, उड्डाणपूल, भुयारी मार्ग अशी विविध कामं सुरु आहेत. महामार्गावर पावसाळ्यात खड्डे पडत असून ते वेळीच बुजवले जात नाहीत. काम सुरु असणाऱ्या ठिकाणी तयार करण्यात आलेल्या बाह्यवळण रस्त्यांचा दर्जा, त्यावरील खड्डे, वाहतूक नियंत्रणातील त्रुटींवर तोडगा काढणं आवश्यक आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीनं तातडीनं उपाययोजना राबवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे समन्वयाची जबाबदारी देण्यात येत आहे. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक पोलीस, भिवंडी, कल्याण व नाशिक महापालिका आयुक्त अशा संबंधित यंत्रणांचे समन्वयन करून पुढील १० दिवसांत उपाययोजना राबवाव्यात. संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींसोबत वाहतूक कोंडीच्या ठिकाणांची पाहणी करून एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करावा, असे निर्देश यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बैठकीत दिले.

बहुतांश वेळा वाहतूक कोंडीत वाहनं खराब झाल्यामुळे पाठीमागच्या बाजूला वाहनांच्या रांगा लागतात. खराब झालेले वाहन तातडीनं दूर करणं आवश्यक असतं. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या ४० टनाच्या क्रेन्स वाहतूक पोलिसांनी उपलब्ध करून घ्याव्यात. त्यासाठी एनएचएआय आणि एमएसआरडीसीनं वाहतूक पोलिसांना निधी उपलब्ध करून द्यावा. गर्दीच्या वेळी वाहतूक कोंडीच्या ठिकाणी ड्रोनद्वारे नियंत्रण ठेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात. कार्यक्षम वाहूतक व्यवस्थेसाठी या महामार्गावरील रहदारीची नियमितपणे ड्रोनद्वारे पाहणी करावी. वाहतूक नियंत्रणासाठी होमगार्डची मदत घेण्यात यावी. एमएसआरडीसीनं वाहतूक पोलिसांना उपलब्ध करून दिलेल्या वॉर्डन यांना गणवेश द्यावा. त्यासाठी लागणारा निधी नियोजन समितीतून दिला जाईल, असं सूचित केलं.

ज्याठिकाणी उड्डाणपूल, भुयारी मार्गाची कामं सुरु आहेत, त्याठिकाणची वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळित होत असल्याचं पाहायला मिळतं. यावर उपाययोजना करण्यासाठी यापुढे कामांच्या ठिकाणी कॉंक्रिटीकरण असलेला पर्यायी रस्ता उपलब्ध करुन दिल्याशिवाय नवीन कामांना परवानगी देण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे आधीच्या रस्त्याच्या उंचीच्या समप्रमाणात पर्यायी रस्ते तयार केले गेले पाहिजेत. अशा प्रकारच्या अटींची पूर्तता करणं बंधनकारक करूनच महामार्गावरील कामांना परवानगी द्यावी, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागास केल्या.

पान १ वरुन

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत

या योजनेत ३४ हजार ९९६ अर्ज प्राप्त झाले असून, आतापर्यंत ३ हजार ९८२ अर्ज मंजूर करण्यात आले असल्याचे तहसिलदार मदन जाधव यांनी सांगितले तसेच महसूल विभागाचा 'महसूल पंधरवडा' १ ते १५ ऑगस्टदरम्यान साजरा होत असून . महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबतची माहिती तहसिलदार जाधव यांनी यावेळी दिली.

तत्वुर्वी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी कांचण सिध्देश्र्वर मोहिते या महिलेचा अर्ज स्वत: आमदार समाधान आवताडे यांनी भरला. यावेळी मंगळवेढा तालुक्यात उत्कृष्ठ काम करणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा त्याचबरोबर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत उत्कृष्ठ काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

### येत्या विधानसभेत मी आमदार

रूपामध्ये पाहायला उत्सुक आहे सर्वसामान्य शेतकरी कष्टकरी कामगार आणि तरुण वर्ग मला आता भगिनी यांची जर का मला आमदार करण्याची इच्छा असेल तर मी पंढरपूर मंगळवेढा तसेच माढा या दोन्ही मतदारसंघांपैकी कुठूनही येता विधानसभेला मी उभे राहून सर्वसामान्य कष्टकरी शेतकरी ऊस उत्पादक तरुण माता भगिनी यांच्या सेवा करण्याची संधी मी आमदार जरूर होईन असे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन अभिताभ पाटील यांनी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले

चेअरमन अभिताभ पाटील यांनी पत्रकार बांधवांनी आपल्या कोणत्या पक्षाच्या वतीने विधानसभेला उभे राहणार आहात. असा प्रश्न्न विचारला असता अभित पाटील यांनी या प्रश्न्नाला बगल देत अमित पाटील यांनी सांगितले की येत्या विधानसभेला मी आमदार होणार एवढे सांगू शकतो पण असे म्हणून त्यांनी राजकीय पक्षाचे नाव न घेता आपण आमदार होणार हे सांगितले

चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने पंढरपूर मंगळवेढा तसेच माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये असंख्य समाज उपयोगी कार्यक्रम आयोजित केलेल्या असून या कार्यक्रमाला चेअरमन अभिताभ पाटील हे उपस्थित राहणार आहेत

### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर

तहसील कार्यालय पंढरपूर येथे कामकाज पाहिले आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांची माढा तहसिल कार्यालय येथे नायब तहसिलदार येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवार दि.१ ऑगस्ट पासून श्रोत्री यांची श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत. श्रोत्री यांनी व्यवस्थापक पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

### देशातील ३० आंतरराज्यीय नदीजोड

आहेत. महाराष्ट्रातील राज्यांतर्गत वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर तयार असल्याचे पाटील यांनी सांगितले. याव्यतिरिक्त कृष्णा–भीमा, दमनगंगा–गोदावरी, वैतरणागोदावरी, दमनगंगा–वैतरणागोदावरी, कोयना–मुंबई सिटी, ोदावरी–पूर्णा–मांजरा, कोयना– निरा, मुळशी–भीमा, सावित्री–भीमा, कृष्णा–भीमा, जळगाव जिल्ह्यातील तापी नदीजोड, नर्मदा–तापी या प्रकल्पांचा पीएफआर तयार झाला असल्याचे त्यांनी सांगितले. नाकारलेले नदीजोड प्रकल्प वैनगंगा–मांजरा, पातळगंगागोदावरी, सावित्री–कुंडलिका– भीमा, नार–पार–गिरना, तापीगोदावरी हे नदीजोड प्रकल्प व्यावहारिक नसल्याचे सरकारने सांगितले. तर वैनगंगा–गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने रद्द केल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## गुजनूर येथे विविध ठिकाणी साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : जगद्विख्यात साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तुळजापूर तालुक्यातील मौजे गुजनूर येथे विविध ठिकाणी अभिवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे नगरातील समाज मंदिर येथे मातंग समाज बांधवांच्या वतीने लोकशाहीर डॉ.आण्णभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सरपंच फुलचंद वाघमारे व उपसरपंच व्यंकट साळुंखे यांच्या हस्ते आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात करून उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन केले तर येथील जि.प.प्राथमिक शाळेत ही आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ,सरपंच, उपसपंच,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिज्क्षक विद्यार्थी पालक उपस्थित होते.तसेच येथील ग्रामपंचायत कार्यालयात ही साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सरपंच फुलचंद वाघमारे, उपसरपंच व्यंकट साळुंखे यांच्या हस्ते आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी माजी सरपंच भास्कर नागमोडे, ग्रामसेवक पी.पी.कुंभार, सामाजिक कार्यकर्ते हरीशकुमार पाटील, शेषराव साळुंखे, माजी सरपंच अण्णाप्पा मुलगे, पांडुरंग नागमोडे, महादेव मोरे महाराज,राहुल वाघमारे, पांडुरंग वाघमारे,सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इंदापूर तालुक्यात सामान्य नागरिकांची दाखल्यांसाठी धावपळ

### निमगाव केतकी मधील म्होरक्या वेळेवर दाखले सोडेना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळेः इंदापूर तालुक्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांनी तहसील कार्यालयासह तालुक्यात ठिकठिकाणी असलेल्या महा-ई-सेवा केंद्रांमध्ये गर्दी केली आहे. कारण राज्य शासनासह स्थानिक पातळीवर शिक्षणासाठी लागणारे दाखले लोकांना वेळेवरती मिळत नसल्याने लोकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यातच सर्व दाखले निमगाव केतकी मधील एका व्यक्तीकडून सुटत असल्याने सदर व्यक्तीची मनमानी वाढल्याने वशिल्यावरती दाखले सोडत असल्याचे बोलले जात आहे.इंदापूर तालुक्यात अनेक गावांमध्ये महा-ई-सेवा केंद्र आहेत. तसेच तहसील कार्यालयामध्ये हे नागरी सुविधा केंद्र आहे. या सर्व ठिकाणाहून त्या त्या भागातील लोक महसूल विभागाशी संबंधित सर्व दाखले काढतात. मात्र इंदापूर तालुक्यात सद्यस्थितीला अनेक दिवस झाले तरी लोकांना आपले दाखले वेळेवर मिळत नसल्याने लोकांमध्ये महसुली विभागाच्या कामाविषयी प्रचंड नाराज आहेत. तालुक्यातील काही महा-ई-सेवा केंद्राचे दाखले ज्या त्या तारखेला सुटतात तर काही महा-ई-सेवा केंद्राची दाखले जाणून बुजून आठ ते दहा दिवस पेंडिंगला ठेवले जात असल्याचे सद्यस्थितीला दिसून येत आहे.या सर्व बाबींना निमगाव केतकी मधील दाखले सोडणारा म्होरक्या जबाबदार असून त्याला प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचा वरदहस्त असल्याची चर्चा आहे. शेटफळगडे येथील एका महा-ई-सेवा केंद्र वाल्याचा पासवर्ड व लॉगिन आयडी निमगाव केतकी मधील व्यक्ती वापरत आहे. तो व्यक्ती इंदापूर तालुक्यातील सर्व महा-ई-सेवा केंद्राचे तसेच इंदापूर मधील नागरी सुविधा केंद्राचे दाखले सोडण्याचे काम करतो. त्यामुळे सध्याच्या स्थितीला इंदापूर तालुक्यात सर्वसामान्य लोकांचे शेकडो दाखले पेंडिंग ला आहेत. तसेच निमगाव केतकी मध्ये किती अधिकृत महा-ई-सेवा केंद्र आहेत हे प्रशासनाला पहिल्यांदा तपासावे लागणार आहे. जी व्यक्ती दुसऱ्याच्या नावावरती महा-ई-सेवा केंद्र चालवत आहे त्या व्यक्ती वरती तातडीने कारवाई करण्यात यावी व सर्वसामान्य लोकांचे दाखले वेळेवरती सोडवण्यात यावेत. अन्यथा इंदापूर तालुक्यात दाखल्यांच्या कारणावरून सामान्य नागरिक उपोषणाला बसू शकतात.

## बाळसमद्र येथे गावाकऱ्याच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/ राहुल साबळे : बाळसमुद्र येते गावाकऱ्याच्या वतीने साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विजय मेरत तंटामुक्ती अध्यक्ष ह होते तर प्रमुख पाहुणे मा पो पाटील दत्तात्रय मेरत. दिलीप आटोळे.

परमेश्र्वर मेरत मा सरपंच, संजय घोंगडे, तातेराव मोरे, राहुल साळवे ग्रा प सदस्य, प्रशांत साळवे वंचित आघाडी अध्यक्ष विनोद वायाळ मा उपसरपंच, भिकाजी गावडे, श्रीकिशन आटोळे भ वि जा भाजपा महाराष्ट्र उपाध्यक्ष दिगंबर मेरत, रामा आटोळे, साधनाताई बोरकर ग्रा प सदस्य, रंगनाथ भी बोरकर, एकनाथ बोरकर हजर होते अध्यक्ष आणी प्रमुख पाहुणे यांनी क्रांतिवीर लहुजी साळवे ध्व्यजाची पूजा करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली नंतर अध्यक्ष आणी प्रमुख पाहुणे यांनी साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पुजन करून हार अर्पण केले त्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मा सरपंच परमेश्र्वर मेरत यांनी भाषनातून साहित्य रत्न याच्या जीवन चरित्रावं प्रकाश टाकला कार्यक्रममाचे सूत्रसंचालन मा रुघुनाथ भिकाजीं बोरकर यांनी केले आणी आभार प्रदर्शन लखन बोरकर यांनी केले नंतर कार्यक्रमाची सांगता करन्यात आली

## अन्याय सहन करण्याचा काळ गेला आता अन्यायाचा प्रतिकार करण्यास बौध्द आणि मातंग समाज अग्रेसर : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात योगदान अभूतपूर्व आणि क्रांतीकारी आहे .त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मरणोत्तर भारतरत्न किताब दिला जावा यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.याबाबत राज्यसरकार ने केंद्र सरकार ला प्रस्ताव पाठवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली पाहिजे. सामाजिक संगीत आणि क्रीडा क्षेत्रात अनेक मान्यवरांना भारतरत्न किताब मिळाला आहे त्यामुळे क्रांतीकारी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न किताब मिळालाच पाहिजे त्यासाठी देण्याबाबत आपण केंद्र सरकार कडे प्रयत्न करीत असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिली.


लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतनिमित्त पुण्यात सारसबाग समोरील त्यांच्या पुतळ्याला केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी भव्य पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर येथे जाहीर अभिवादन सभेचे आयोजन मातंग समाज समन्वय समिती तर्फे करण्यात आले होते यावेळी रिपाइं चे दिवंगत ज्येष्ठ नेते कालकथित हनुमंत साठे स्मृतिप्रीत्यर्थ सामजिक कार्यकर्ता पुरस्कार ना.रामदास आठवले यांच्या हस्ते रिपाइं चे राज्य सचिव बाळासाहेब जानराव यांना प्रदान करण्यात आला.

अन्याय सहन करण्याचा काळ आता गेला आहे आता अन्यायाचा प्रतिकार करण्याचा काळ सुरू झाला आहे.अन्यायाचा प्रतिकार करण्यास नवबौध्द आणि मातंग समाज आघडीवर अग्रेसर आहे .मातंग समाज आणि बौध्द समाजात राजकीय सामजिक जागृती मोठ्या प्रमाणावर असून लढणारा झुंजार समाज म्हणून बौध्द आणि मातंग समाज मोठी ताकद आहे.लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना खरे अभिवादन करायचे असेल तर बौध्द आणि मातंग समाजाने एकजूट व्हावे असे आवाहन ना.रामदास आठवलेंनी केले.

यावेळी मातंग समाज समन्वय समितीचे भीमराव पाटोळे ; विरेन साठे; रवी अर्डे; प्रकाश वैराळ; दत्ता जाधव; असित गांगुर्डे; महेंद्र कांबळे; संघमित्रा गायकवाड; हिमाली नवनाथ कांबळे; परशुराम वाडेकर; संजय सोनवणे; निलेश अल्हाट, उमेश कांबळे,यशवंत नडगम; विशाल शेवाळे अशोक जगताप संगीता चौरे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

सायंकाळी ७ वाजता ना.रामदास आठवले यांनी मुंबईत चुनाभट्टी सुमन नगर येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

## राष्ट्रीय समाज पक्षाच्या अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी दत्तात्रय माडकर यांची फेरनिवड



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः राष्ट्रीय समाज पक्षाच्या अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी दत्तात्रय माडकर यांची फेरनिवड आज राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते यांच्या शुभहस्ते नियुक्ती करण्यात आली. गुरुवार दिनांक १ ऑगस्ट रोजी सर्जेराव जाधव सभागृह येथे बुथप्रमुखांचा मेळावा तसेच नवनियुक्त पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य महासचिव माऊली नाना सलगर, पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील दादा बंडगर, अक्कलकोट विधानसभा निरीक्षक अजितदादा पाटील, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष परमेश्र्वर पुजारी, यशवंत सोंडगे, सोलापूर शहर अध्यक्ष सतीश बुजूरके आदी उपस्थित होते. नियुक्ती झाल्यानंतर आपले मनोगत व्यक्त करताना तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर म्हणाले की अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील ३९० बुथप्रमुख नेमून आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे संघटन वाढवून गाव तेथे शाखा आणि शाखा तेथे कार्यकर्ता तयार करणार असल्याचे सांगितले.

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात लो. टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट: महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्य चळवळीच्या ज्वाला भारतीयांच्या मनात - मनात चेतवणारे अग्रगण्य नेते, स्वदेशी चे पुरस्कर्ते व समाजातील अनेक वाईट कुप्रथेविषयी कडाडून विरोध करुन लोकजागृती करणारे जहालमतवादी, प्रखर राष्ट्रवादी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अन्याय, अत्याचार, शोषण करणाऱ्या जुलमी प्रस्थापितांविरुध्द बंड करून आपल्या शाहीरी, पोवाडे च्या माध्यमातून जनजागृती करणारे थोर समाजसुधारक, साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती निमित्त इयत्ता आठवीतील विद्यार्थी आदित्य क्षीरसागर हा शाहीरी सादरीकरण केला. इयत्ता पाचवीतील सिद्धी होटकर ही मुलगी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर भाषण केली. याशिवाय लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे जीवन परिचय डिजिटल क्लासरूम मध्ये चित्रपट प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, रूपाली शहा, पुनम कोकळगी,प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी,दिगंबर जगताप, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.कल्पना स्वामी, राजकुमार गवळी, सिद्धाराम पाटील, बाबुशा मंगरूळे, श्रीदेवी मायनाळे, किणगी मॅडम आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मला या हिरेमठ यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार इयत्ता दहावीतील विद्यार्थी समर्थ सुतार यांनी केले.

## नारंगवाडीत केला झाडाचा वाढदिवस



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

उमरगा /प्रतिनिधी:- तालुक्यातील नारंगवाडी येथे नारंगवाडी सेवा समुह सामाजिक संस्थेच्या वतीने दुष्काळात ७वर्षा पुर्वी गावात व परीसरात दोन हजाराचा वर झाडे वाटप व लागवड करण्यात आले होते. काही ठिकाणी झाडे डेरेदार व मोठे झाले आहेत

दर वर्षी ऐका झाडांचा वाढदिवस केला जातो या ही वर्षी वडाचा झाडाचा वाढदिवस करण्यात आला पारंब्या आलेल्या वडाचे जंगदंबा मंदिराचा समोरील झाडाचे मोठ्या जल्लोषात विधीवत बँड लाऊन लग्न सोहळा पार पडला या लग्न सोहळ्यासाठी गावातील नागरीक व महिला मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.यावेळी संस्थेचे अध्क्ष विठ्ठल चिकुंद्रे,श्रीधर पवार,सचिव अमोल चव्हाण,पिंटु स्वामी,दादा चिकुंद्रे,राम माने,सुधाकर घंटे,नितीन कुलकर्णी,राजेंद्र पवार,बबलु चिकुंद्रे,विष्णु पांचाळ,बंडु पवार,सदाशिव आष्टे विशाल पाटील,शांताबाई सोमवशी,महानंदा पांचाळ,बेबीताई चिकुंद्रे,विमलबाई मुगळे,विमल पवार,ठकुबाई चिकुंद्रे,विजया पवार,बबीता चिकुंद्रे,लहुबाई पवार आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थितीत होत्या.

# महसूल पंधरवड्याचा उत्साहात शुभारंभ

## जिल्ह्यात १५ ऑगस्ट पर्यत महसूल दिनानिमित्त विविध कार्यक्रम




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात महसूल विभागाचा 'महसूल पंधरवडा' १ ते १५ ऑगस्टदरम्यान साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा, तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्र्वास वृद्धिंगत व्हावा, यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने 'महसूल पंधरवडा' साजरा करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी सांगितले.

या उपक्रमात दि. ०१ ऑगस्ट रोजी तसेच ३० जुलै ते १ ऑगस्ट २०२४ या तीन दिवसाच्या कालावधीत रामचंद्र मिशन मेडिटेशन सेंटर यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी ताणतणाव व्यवस्थापन करणेच्या उद्देशनाने मेडिटेशन बाबत प्रात्यक्षिक मार्गदर्शन करण्यात आले तसेच महसूल दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर व मेट्रोपॉलीस लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व महसूल कर्मचारी व त्यांचे कुटुंबाकरिता महा आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले सदर वैद्यकीय शिबीरामध्ये रक्त तपासणी (उइउ), रक्तातील साखर व रक्तदाब यांचे मोफत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच इतर शारीरीक चाचण्या ८०% सवलतीसह करण्याची सुविधा करणेत आली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण अंतर्गत २ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालया येथे व्यसनाधीनतेपासून मुक्ती या विषयावर डॉ.थडसरे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. तसचे जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी सदर योजनेचा लाभ युवकांना प्राप्त होण्यासाठी प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. दि. ३ ऑगस्ट २० रोजी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, दि.४ ऑगस्ट रोजी स्वच्छ व सुंदर माझ कार्यालय अंतर्गत जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, मंडळ व तलाठी कार्यालयामध्ये स्वच्छता व निटनेटकेपणा व सुंदर कार्यालय करणेकामी जिल्हास्तरावरून सर्व संबंधित अधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहेत.

कृषि मार्गदर्शन कार्यक्रम अंतर्गत ५ ऑगस्ट रोजी शेतकरी बांधवांसाठी शेती व शेतीविषयक कामे, बि-बियाने खते, पशुसंवर्धन पिक संरक्षण, धान्य साठवण, कृषि उत्पादनाचे मुल्यवर्धन प्रक्रिया व बाजारपेठ उपलब्धता इत्यादी विषयांबाबत विशेष प्रशिक्षण शिबीर जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आले आहे. तसेच शेतकरी बांधवांसाठी व अल्प भुधारक इत्यादींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना कार्यक्रम इत्यादी प्रसिध्दी देणेकामी संबंधित शासकीय कार्यालयास निर्देश देण्यात आले आहे. तसेच १००टक्के ई-पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे बाबत कार्यशाळा घेऊन जनजागृती करण्याबाबत शेतकरी बांधवांना सहाय्यभूत ठरणाऱ्या मोबाईल प्लीकेशन याबाबत माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले.

दि. ६ ऑगस्टला शेती, पाऊस आणि दाखले, दि. ७ ऑगस्टला युवा संवाद कार्यक्रम, दि. ८ ऑगस्टला महसूल - जन संवाद, दि. ९ ऑगस्टला महसूल ई-प्रणाली, दि.१० ऑगस्ट रोजी सौनिक हो तुमच्यासाठी अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षिततेच्या कामी शिमावर्ती भागामध्ये व संवेदनशील भागामाध्ये तैनात असणारे संरक्षण दलातील अधिकारी सैनिक यांना व त्यांच्या कुटुंबियांना आवश्यक असणारे महसूल कार्यालयाकडून निर्गमीत होणार विविध दाखल प्रमाणपत्राबाबत कार्यवाही करणेकामी सर्व महसूल यंत्रणेस निर्देश देण्यात आले आहे. तसेच संरक्षण दलात कार्यरत असताणा शहिद झालेल्या जवानांच्या कुटुंबांना जमीन वाटपाबाबतची प्रलंबित प्रकरणे तसेच त्यांचे इतर प्रलंबित प्रश्र्न काम तात्काळ नियामानुसार निर्गमित करणे कामी संबंधित शासकीय यंत्रणेस निर्देश देण्यात आला आहे. याबाबत जिल्हास्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ११ ऑगस्टला आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम

दि.१२ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा अंतर्गत जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांना शासकीय योजनेची माहिती उपलब्ध करून देणे, शासकीय योजनांसाठी आवश्यक असणारे महसूल विभागाशी संबंधित दाखले, प्रमाणपत्र देणे तसेच विविध योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाच्या अनुषंगाने जिल्हा, तालुका स्तरावरून स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने उपकरणे वाटप करणे असे निर्देश देण्यात आले आहे. याबात जिल्हा स्तरावर कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहे.

दि.१३ ऑगस्ट रोजी महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्यसाठी संवाद प्रशिक्षण अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत सर्व महसूल कर्मचारी अधिकारी यांना विविध महसूली कायदेविषयक बाबींचे प्रशिक्षण आयोजन केले आहे. दि. १४ ऑगस्टला महसूल पंधरवडा वार्तालाप कार्यक्रम.

तसेच श्री. शिवछत्रपती रंगभवन सोलापूर येथे महसूल पंधरवडा २०२४ च्या सांगता समारंभामध्ये महसूल संवर्गातील कार्यरत उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांचे २०२३-२०२४ मध्ये विशेष उल्लेखनिय कामकाजाची दखल घेऊन त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव व सत्कार करण्यात येणार आहे. तसेच कार्यरत कर्मचारी यांचे १० वी व १२ परिक्षा २०२४ मधील गुणवंत पाल्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव सत्कार करण्याचे आयोजन केले आहे. तसेच या दिवशी महसूल अधिकारी, कर्मचारी यांना मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.



## इंदापूर महाविद्यालयामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

इंदापुर/ अतुल सोनकांबळेः इंदापूर तालुका प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात आज दिनांक ०१ ऑगस्ट २०२४ रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर म्हंटले की साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आठवतात . महाराष्ट्राची शान व बहूजणांचा आण म्हणजे लोकशाहीर होते. त्यांचे कार्य समजल्यावर माणसाना जगण्याचा अर्थ कळतो. कामगारांना त्यांचे अधिकार कळतात असे मत प्राचार्य डॉ.जीवन सरवदे यांनी मांडले.ज्या प्रमाणे लोकशाहीर यांचे कार्य आहे त्याच प्रमाणे लोकमान्य यांचे कार्य समाजाला दिशा देणारे आहे . प्रत्येक महापुरुष हे त्यांच्या कर्म व कार्याने समाजातील तरुणांना नवीन विचार देतात असेही ते म्हणाले. यावेळी डॉ. शिवाजी वीर, डॉ.भिमाजी भोर व डॉ. एस.एन.पवार यांनी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या विचारांची व कार्याची माहिती दिली.

उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे , कार्यलयीन प्रमुख अभिमन्यू भंडलकर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तानाजी कसबे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.उत्तम माने यांनी मानले.

## अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य निर्मितीतून महापुरुषांचा इतिहास मांडला : किरण गायकवाड

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



उमरगा/प्रतिनिधी : शिवराय, फुले, शाहू व आंबेडकर यांच्या समता व सामाजिक न्यायाच्या विचारांची परिवर्तनवादी चळवळ अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य निर्मितीतून महापुरुषांचा इतिहास मांडल्याचे प्रतिपादन वीर भगतसिंह विद्यार्थी परिषदेचे विभागीय उपाध्यक्ष किरण गायकवाड यांनी केले. अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ वी जयंतीनिमित्त गुरूवारी (ता. १) रोजी आयोजित शहरातील अण्णाभाऊ साठे चौकातील सभागृहात अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रमोद कुलकर्णी होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे विभागीय उपाध्यक्ष किरण गायकवाड, मराठा सेवा संघाचे संजय सावंत, श्रीधर इंगळे, माजी नगराध्यक्ष बबनराव बनसोडे, अजिंक्य मुरूमकर आदींची उपस्थित होती. पुढे बोलताना किरण गायकवाड म्हणाले की. अण्णाभाऊंनी नाटकातील गणवंदना बंद करुन प्रथम मायभुच्या चरणा, छत्रपती शिवबा चरणा, स्मरोनी गातो कवना, असे म्हणत शिवरायांना अभिवादनाची वंदना सुरु केली. जग बदल घालुनी घाव सांगुन गेले मजं भिमराव, असे म्हणत मनुवादी विचारसरणीवर घणाघाती घाव घातला. अण्णाभाऊ साठे हे अवघे दिड दिवस शाळेत जावून विविध प्रकारच्या कथा, कादंबऱ्या, शाहीरी, कविता, लोकनाट्य, नाटके, स्फुटलेखन असे साहित्य निर्माण केले. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास प्रमोद कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. संजय सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात प्रमोद कुलकर्णी यांनी अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजासाठी दिशादर्शक असल्याचे म्हटले. या कार्यक्रमासाठी बबनराव बनसोडे, शेषेराव सरवदे, विनायक देडे, राजेंद्र देडे, अमित देडे, तुळशीराम देडे, मल्लाप्पा देडे, किरण देडे, बालाजी बनसोडे, सुमित बनसोडे, ओमकार कांबळे, रोहित कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशाला येथे लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः स्वातंत्र्य चळवळीची ज्वाला भारतीयांच्या मनात - मनात चेतवणारे अग्रगण्य नेते, स्वदेशी चे पुरस्कृते व समाजातील अनेक वाईट कुप्रथेविषयी कडाडून विरोध करुन लोकजागृती करणारे जहालमतवादी,प्रखर राष्ट्रवादी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अन्याय, अत्याचार, शोषण करणाऱ्या जुलमी प्रस्थापितांविरुध्द बंड करून आपल्या शाहीरी, पोवाडे च्या माध्यमातून जनजागृती करणारे थोर समाजसुधारक, साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे अत्यंत भावमय वातावरणात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे व पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते या महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रशालेच्या कुमार सुभाष फसगे( इ. ७ वी),कु.ऐश्र्वर्या निकम, कु. अदिती निकम, कु. सरिता रोट्टे ( इ.८ वी ), कु.स्मिता काळे ( इ. १०वी) या मुलां-मुलींची अतिशय सुंदर भाषणे झाली.

या सर्व विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य देऊन प्रशालेच्यावतीने कौतुक करण्यात आले.जेष्ठ शिक्षक श्री. शहाजी माने यांनी या दोनही महापुरुषांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ.स्वप्नाली जमदाडे यांनी केले तर आभार सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांनी मानले. यावेळी जेष्ठ शिक्षक धनंजय जोजन,अप्पासाहेब काळे, सरदार मत्तेखाने, शशी अंकलगे,प्रा.रविंद्र कालीबत्ते व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## नळदुर्ग व परिसरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकची फोन पे गुगल पे सेवा चार पाच दिवसांपासून बंद : याकडे कोणी लक्ष देईल का..?

**दैनिक यशसिद्धी न्यूज**




वागदरी/एस.के.गायकवाडः तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग,वागदरी व परिसरातील महाराष्ट्र ग्रामीण बँक ची फोन पे व गुगल पे सेवा गेल्या चार पाच दिवसांपासून बंद पडल्याने आर्थिक व्यवहाराची फार मोठी कोंडी झाली आहे.या कडे कोण लक्ष देईल का? यांची तक्रार नेमकी कोणाकडे करायची ही सेवा म्हणजे ना धनी ना गोसावी या प्रमाणे झाली आहे.त्यामुळे ग्राहकांकडून या बाबत संताप व्यक्त केला जात आहे.

डिजिटल इंडिया च्या नावाखाली सर्व बँक खाते पॅनकार्ड मोबाईल नंबर आधार कार्ड सी जोडून फोन पे गुगल पे वगैरे द्वारे ऑन लाईन आर्थिक व्यवहाराची शक्ती शासन करते यामुळे ग्रहाकानी या सेवेचा लाभ घेण्यासाठी लाखो ग्राहकांनी फोन पे गुगल पे सेवा सुरू केली.ग्रहाकांच्या दृष्टीने कुठे ही केंव्हा ही खरेदी विक्री चा आर्थिक व्यवहार असेल किंवा वैयक्तिक आर्थिक देवाणघेवाण असेल किंवा बस प्रवास भाडे असेल आदी आर्थिक व्यवहार फोन पे गुगल पे द्वारे करताना ग्राहकांतून समाधान व्यक्त केले जात आहे. ग्राहकांना आता फोन पे व गुगल पे द्वारे आर्थिक व्यवहार करण्याची सवय झाली आहे.परंतू गेल्या चार पाच दिवसांपासून महाराष्ट्र ग्रामीण बँक ची सदर फोन पे गुगल पे सेवा ठप्प झाल्याने आर्थिक व्यवहाराची फार मोठी कोंडी झाली आहे.तरी संबंधितांनी या कडे लक्ष देवून लवकरात लवकर सदर सेवा सुरू करावी ग्राहकांतून होते आहे.




स्वेरीमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करताना कोल्हापूर मधील महर्षी स्वामी विवेकानंद इंजिनिअरिंग कॉलेजचे संचालक विरेन भिरडी, सोबत डावीकडून डॉ. श्रीकृष्ण भोसले, प्रा. बी.टी. गडदे, एस.डी.पवार, संभाजी पवार, प्रा.शिरीष कुलकर्णी, युवा विश्र्वस्त प्रा. सुरज रोंगे, संचालक विरेन भिरडी, डॉ.यशपाल खेडकर, प्रा. दिग्विजय रोंगे, व इतर प्राध्यापिका, प्रा. पी.डी.बाबर, प्रा.अमित शिंदे.